मुख्य कार्यालय, विरार
विरार (प),
ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र: व.वि.श.म./ / /२५-२६
दिनांक : 13/08/2025

## हर घर तिरंगा अभियानाअंतर्गत महानगरपालिकेमार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत सन २०२५ मध्ये सुद्धा “घरोघरी तिरंगा” (हर घर तिरंगा) मोहिम वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येत असून महानगरपालिका मुख्यालय व प्रभाग समिती कार्यालयांमार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन व नियोजन करण्यात आले आहे.

मनपा मुख्यालय तसेच प्रभाग समित्यांतर्गत राष्ट्रध्वजास समर्पित “बाईक रॅलीचे” , तिरंगा रॅलीचे काढण्यात आल्या. यावेळी तिरंगा ध्वज हाती घेवून देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. सर्व नागरिकांनी दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजीपर्यंत आपल्या घरावर, इमारतीवर, आस्थापनेवर देशाचा तिरंगा ध्वज फडकवून “घरोघरी तिरंगा” या राष्ट्रभक्तीने प्रेरित अभियानात सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. त्याचप्रमाणे महानगरपालिका क्रीडा विभागामार्फत ०३ कि.मी.पर्यंतच्या “तिरंगा दौड” चे आयोजन महानगरपालिका मुख्यालयाच्या ठिकाणी करण्यात आले होते. यामध्ये विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी, धावपटूंनी भाग घेतला. यावेळी ३० फुट लांबीचा तिरंगा ध्वज घेऊन विद्यार्थी व उपस्थितांमार्फत देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. विविध ठिकाणी वृक्षारोपणही करण्यात आले. त्याचप्रमाणे नागरिकांना तिरंगा ध्वज, राष्ट्रीय स्वातंत्र्य दिनासंबंधीच्या आवश्यक इतर वस्तू उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महानगरपालीकेतर्फे बचत गटांच्यामार्फत विविध ठिकाणी बाजारपेठा सुरु करण्यात आल्या आहेत. या बाजारपेठा १)कॅपिटल मॉल समोर, नालासोपारा पूर्व २)डी मार्ट समोर, यशवंत नगर, विरार पश्चिम ३) डी मार्ट जवळ, मनवेलपाडा रोड, विरार पश्चिम ४) वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालयासमोर, विरार पश्चिम येथे सुरु करण्यात आल्या आहेत.

त्याचप्रमाणे महानगरपालिकेमार्फत मुख्य रस्ते, चौक, उद्याने, मनपा कार्यालये येथे तिरंगा थीम रोषणाई करण्यात येत असून विविध ठिकाणी तिरंगा झेंडा लावण्यात येत आहे. तसेच नागरिकांना तिरंगा सोबत फोटो काढण्यासाठी विविध ठिकाणी सेल्फी पॉईंट उभारण्यात येत आहेत. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील शाळा, महाविद्यालये यांमध्येही विविध देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त महानगरपालिका मुख्यालय व प्रभाग समिती कार्यालयांमध्ये सकाळी ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमानंतर “घरोघरी तिरंगा” (हर घर तिरंगा) मोहिमेंतर्गत “तिरंगा रॅली” व “स्वच्छता रॅली” यांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व नागरिकांनी राष्ट्रभक्तीने प्रेरित अभियानात सहभागी होण्याचे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.